# पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई

## !!प्रेसनोट!!

**मदत मागण्याच्या बहाण्याने संपर्क करून प्रतिष्ठीत लोकांना आपल्या जाळयात अडकवून पैशाची मागणी करणा—या आरोपीतास सायबर गुन्हे शाखेकडुन अटक**

| | | |
|---|---|---|
| ०१ | पोलीस ठाणे | पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाणे, मुंबई |
| ०२ | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम | गु.र.क्र. ४५/२०२१ कलम ३८४,५००,३४ भा.दं.वि.सं सह ६६(क), ६६(ड), ६७ माहिती व तंत्रज्ञान कायदा (सुधारीत) २००८ |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक व वेळ | दि. १९/१०/२१ पासुन ते दिनांक २३/१०/२०२१ रोजीपर्यंत |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २३/१०/२०२१ रोजी १४:०० वा. |
| ०५ | गुन्ह्याचे घटनास्थळ | इंटरनेटव्दारे |
| ०६ | अटक आरोपी | मौसमदीन दीन मोहमद खान, वय ३३ वर्षे, रा.ठि. भरतपुर, राजस्थान |
| ०७ | तपासी अधिकारी | १) पोलीस निरीक्षक श्रीमती सविता शिंदे<br>२) पोलीस उप निरीक्षक श्री राहुल खेत्रे |

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत** :— दिनांक २३/१०/२१ रोजी वरिलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील बळित प्रतिष्ठीत व्यक्ती असून त्यांचेशी प्रथम आरोपीताने महिला असल्याचे भासवून फेसबुक या सोशल मिडीया माध्यमाचा वापर करून मदत मिळणेसाठी संपर्क केला. त्यानंतर बळिताशी वॉटसअप माध्यमातून संपर्क साधून मदत मागण्याच्या बहाण्याने संभाषणात गुंतवून व्हिडिओ कॉल घेण्यास भाग पाडले. या दरम्यान अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बळित व्यक्तिचे मॉर्फ फोटो व व्हिडिओ तयार करून त्यांचा वापर करून बळितास त्याचे मॉर्फ केलेले फोटो व व्हिडिओ वायरल करण्याची धमकी देवून पैशाची मागणी करण्यात आली. सदर प्रकरणी बळीत व्यक्तिने तात्काळ पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणेशी संपर्क साधला असता त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार गु.र.क्र. ४५/२०२१ कलम ३८४,५००,३४ भा.दं.वि.सं सह ६६(क), ६६(ड), ६७ माहिती व तंत्रज्ञान कायदा (सुधारीत) २००८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणी सायबर पोलीस ठाणे यांनी तांत्रीक पध्दतीने तपास केला असता सदरचे आरोपी हे भरतपूर राजस्थान येथे असल्याची माहिती प्राप्त झाल्याने सदर ठिकाणी पोलीस पथक पाठवून स्थानीक पोलीसांच्या मदतीने आरोपी नामे मौसमदीन दीन मोहमद खान, वय ३३ वर्षे, रा. ठि. भरतपुर, राजस्थान यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयामध्ये आरोपीताचे इतर ०२ साथीदार यांचा स्थानीक पोलीसांच्या मदतीने शोध सुरू आहे.

अशाप्रकारे प्रतिष्ठीत व्यक्तिंची सोशल मिडीयाव्दारे संपर्क करून त्यांचेशी मदत मागण्याच्या किंवा मैत्री करण्याच्या बहाण्याने तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांचे फोटो मॉर्फ करून त्यांचेकडून सदरचे मॉर्फ केलेले फोटो/व्हिडिओ प्रकाशित करण्याची धमकी देवून पैसे उकळणा—या आरोपीतास पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, मुंबई यांनी अटक केली आहे. नमुद आरोपीताने अशा अनेकांची फसवणूक केल्याचे दिसून येत आहे. त्या अनुषंगाने अधिक तपास सुरू आहे.

सायबर क्राईम ब्रॅच, मुंबई कडून जनतेस आवाहन करण्यात येते की, कोणतीही अनोळखी व्यक्तिकडून आपणास सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवर फ्रेंड रिक्वेस्ट आल्यास त्याबाबत खात्री करूनच ती स्विकारावी. सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवरून मैत्री करताना प्रायव्हसी व सिक्युरिटी निर्देशांचे पालन करावेत. व वेळोवेळी सदर माहिती अदयावत करावी. आपणास अशाप्रकारच्या फसविणा—या इसमांकडून फ्रेंड रिक्वेस्ट आल्यास त्याबाबतची माहीती तात्काळ नजिकच्या पोलीस ठाणेस अथवा सायबर पोलीस ठाणेस दयावी.

सदरची प्रभावी कारवाई मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मुंबई श्री.मिलिंद भारंबे, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. विरेश प्रभु, मा. पोलीस उप आयुक्त डॉ. रश्मी करंदीकर (सायबर गुन्हे मुंबई , सहायक पोलीस आयुक्त श्री. नितीन जाधव (सायबर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली पश्चिम प्रादेशिक विभाग सायबर पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती शर्मिला सहस्त्रबुध्दे, पोनि श्रीमती सविता शिंदे, पोनि श्री मंगेश मजगर, पोउपनिरीक्षक श्री राहुल खेत्रे, पोउपनिरीक्षक श्री गणेश शिर्के पोशि. श्री दिपक पडळकर, पोशि श्री अनिल वारे यांनी यशस्वीपणे पार पाडली.